NAAC - 'B' (2.67)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# Changing Phases in WOMEN EMPOWERMENT

*A Proceeding of UGC Sponsored National Conference*


**Chief Editor**

Prin. (Dr.) Madhukar Y. Bachulkar

**Editors**

Mrs. Renuka A. Pawar
Dr. Sachin J. Pawar
Dr. Prashant P. Yadav
Dr. Varsharani N. Sahadev
Mr. Ramesh H. Karande
Mr. Dinesh J. Bhandare
Mr. Rajaram H. Atigre



ISBN 978-93-82028-26-0

**Shri. Vijaysinha Yadav Arts & Science College**
Peth Vadgaon, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur - 416 112 (MS)

NAAC - 'B' (2.67)

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

# Changing Phases in WOMEN EMPOWERMENT

*A Proceeding of UGC Sponsored National Conference*


**• Chief Editor •**

Prin. (Dr.) Madhukar Y. Bachulkar

**• Editors •**

Mrs. Renuka A. Pawar
Dr. Sachin J. Pawar
Dr. Prashant P. Yadav
Dr. Varsharani N. Sahadev
Mr. Ramesh H. Karande
Mr. Dinesh J. Bhandare
Mr. Rajaram H. Atigre



**Shri. Vijaysinha Yadav Arts & Science College**

Peth Vadgaon, Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur - 416 112 (MS)

# Published Book Information


- **Book Title** : *Changing Phases in Women Empowerment*
  *A Proceeding of UGC Sponsored National Conference*
- **Chief Editor** : Prin. (Dr.) Madhukar Y. Bachulkar
- **Editors** : Mrs. Renuka A. Pawar
  Dr. Sachin J. Pawar
  Dr. Prashant P. Yadav
  Dr. Varsharani N. Sahadev
  Mr. Ramesh H. Karande
  Mr. Dinesh J. Bhandare
  Mr. Rajaram H. Atigre
- **Reviewers** : Mrs. Renuka A. Pawar
  Dr. Sachin J. Pawar
  Dr. Prashant P. Yadav
  Dr. Varsharani N. Sahadev
  Mr. Ramesh H. Karande
  Mr. Dinesh J. Bhandare
  Mr. Rajaram H. Atigre
  Mr. Nikhil H. Gote
  Miss. Ashlesha S. Patil
  Miss. Renu L. Sutar
  Mr. Navnath K. Chavan
- **Subject of the book** : General Concept
- **Name of the Publisher** : Mr. Anil Mhamane
  Director,
  Nirmiti Sanwad Publications Pvt. Ltd., Kolhapur.
  873, C/2, C Ward, Siddhishri Plaza,
  Rajaram Road, Kolhapur 416 002
  Mobile : 9890554340, 9822472109
  Email : nirmitisanwad@gmail.com
- **ISBN No.** : 978-93-82028-26-0
- **Name of the Printers** : Samrudhi Offset, Industrial Estate, Panjarpol, Kolhapur.
- **No. of Pages** : 658
- **Size** : A-4
- **No. Of Copies** : 500



**Disclaimer :** The views published in the book are the personal opinions of the research paper contributors. The editors and reviewers are not abide to it any way.

| | | |
|---|---|---|
| 135 | मराठी दलित स्त्रियांचे वङ्मयीन कर्तृत्व<br>सर्जेराव पदमाकर | 423-424 |
| 136 | ग्रामीण महिला सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गटः एक प्रभावी माध्यम<br>मंगल भास्कर माळगे | 425-427 |
| 137 | भारतीय स्त्रियांचे प्रश्न<br>सुनिता अमृतसागर | 428-429 |
| 138 | पंचायत राज्यातील स्त्रियांचा सहभाग<br>शेषनारायण श्रीमंत वडवे | 430-431 |
| 139 | जिजामाता कृषीभूषण – सौ. मिनाक्षी मदन चौगुले<br>माधुरी आर. खोत | 432-434 |
| 140 | स्त्री शिक्षणाचे महत्त्व<br>एल. एस. पाटील*, अजितकुमार भिमराव पाटील** | 435-438 |
| 141 | महिला सबलीकरणातील समाजसुधारकांचे योगदान<br>व्ही. बी. पांढरपट्टे | 439-441 |
| 142 | कृषी क्षत्रातील स्त्रियांचे सबलीकरण<br>एस.के. नाईक | 442-443 |
| 143 | स्त्री सबलीकरण<br>उषादेवी एकनाथ साळुंखे , बी.जे. कदम | 444-446 |
| 144 | जागतिकीरण आणि महिला सबलीकरण<br>बी. जे. कदम, मारूती सुभाष सुर्यवंशी | 447-450 |
| 145 | ग्रंथालयातील मुलींचा सहभाग : एक दृष्टिक्षेप<br>संजना संदिप पाटील | 451-452 |
| 146 | आंबेडकरी चळवळ आणि स्त्री सहभाग<br>मीना देविदास गायकवाड | 453-456 |
| 147 | महिला सबलीकरण : काळाची गरज<br>सुलभा अधिकराव पाटील, जोतीराम मोहन माने | 457-460 |
| 148 | उदिम–व्यवसायातील स्त्रियांचे सबलीकरण<br>सर्जेराव सदाशिव जाधव | 461-463 |
| 149 | महिला विकास कार्यक्रम<br>सचिन महादेव पाटील | 464-466 |
| 150 | स्त्रीयांच्या सबलीकरणात मराठी साहित्यातील स्त्रीदाचे योगदान<br>भीमराव खं. वानोळे | 467-470 |
| 151 | भारतातील महिलांच्या समस्या<br>आर.डी. आचार्य | 471-472 |
| 152 | अत्याचार करणाऱ्यांची मानसिकता : कारणे व उपाय<br>अनिता संजय चिखलीकर | 473-474 |
| 153 | महिलांच्या सबलीकरणाचे बदलते टप्पे<br>पी. डी. जगताप | 475-477 |
| 154 | सहकार चळवळ आणि महिला सबलीकरण<br>वृषाली वसंतराव बर्गे | 478-480 |
| 155 | महात्मा फुले आणि स्त्रियांच्या चळवळी<br>गितांजली अभिजित मिसाळ | 481-485 |
| 156 | स्त्रीवादी साहित्य संकल्पना : एक आकलन<br>भारती श्रीधर कोळेकर | 486-489 |
| 157 | स्त्री–परिवर्तन<br>दीपा यशवंत कुलकर्णी | 490-492 |
| 158 | भारतातील महिला निरक्षरता : एक अभ्यास<br>सी. बी. माने | 493-494 |
| 159 | स्त्री सबलीकरण आणि ताराबाई शिंदे कृत स्त्रीपुरूष तुलना<br>लता पांडूरंग मोरे | 495-497 |

# स्त्रीवादी साहित्य संकल्पना : एक आकलन

भारती श्रीधर कोळेकर
८६६ ब, गुजर बरतीजवळ, पेठवडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. पीन ४१६११२, (महा.) भारत
bharatikolekar2012@gmail.com

**गोषवारा**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीला टिकवून ठेवण्यात स्त्रियांच्या मोलाचा वाटा आहे. असे असूनही धर्म, संस्कृती इथल्या प्रथा परंपरा, धर्मग्रंथ, पुरुषी वर्चस्व इत्यादीमुळे नेहमीच तिला दुय्यम लेखले आहे. सिंधू संस्कृतीमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या माध्यमातून तिला विशेष अधिकार दिले गेले. पण इथल्या वैदिक ग्रंथानी आणि समाजव्यवस्थेने तिचे स्वतंत्र अस्तित्वच नाकारले. महावीर, बळी, बुद्ध, चार्वाक, संत बसवेश्वर, चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम, छ. शिवाजी महाराज, महात्मा जोतीबा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसुधारकांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी विविध आंदोलने केली. विविध ग्रंथांची निर्मिती करुन समाजाला कृतीकार्यक्रम दिले. तरीही स्वातंत्र्यानंतर स्त्रीवादी साहित्याचा व स्वातंत्र्याचा विचार करताना ती आज पूर्णपणे मुक्त आहे. असे ठामपणे म्हणू शकत नाही.

भारतीय संस्कृतीत स्त्रीचं अस्तित्व विविध भुमिका व नात्यांच्या माध्यमातून समोर येते. प्राचीनकाळापासून पौराणिक ग्रंथ, संत साहित्य, स्त्री लोकगीते यांच्या माध्यमातून स्त्रीजीवनाचे उत्कट दर्शन घडले आहे. त्यातून चित्रीत होणारी स्त्री आदर्शवादी, सोशिक, पतिव्रता स्त्री म्हणून आली आहे. तिच्या पातिव्रत्याची कसोटी तर साक्षात अग्निप्रवेशापर्यंत घेतली गेली. या स्त्री दुःखाकडे मात्र पावित्र्याच्या संकल्पनेइतके गांभीर्याने पाहिले गेले नाही. स्वातंत्र्यानंतर मात्र स्त्रियांच्या जीवनजाणिवा प्रगल्भ झाल्या आणि तिच्या अस्तित्वाच्या अनुषंगाने या जाणिवा साहित्यात प्रतिबिंबित झाल्या आणि हळूहळू स्त्रीवादी साहित्य आणि संकल्पना विकसित होऊ लागली.

**प्रस्तावना :**

पण भारतीय स्त्रीवादी साहित्य संकल्पनेचा अभ्यास करताना आपण पाश्चात्य स्त्रीवादाच्या अनुकरणाने आलेला स्त्रीवाद असे म्हणतो तेव्हा हजारो वर्षापासून सिंधूसंस्कृती, महावीर, बुद्ध, चार्वाक, अनेक संत यांनी स्त्रीयांना जे समतेचे स्थान दिले याचा कदाचित आपणांस विसर पडतो. तसेच मुळच्या भारतीय स्त्रीवादाला परंपरा, इतिहास असूनही पाश्चात्य स्त्रीवादाचा बेगडी मुलामा दिल्यासारखे होईल. म्हणूनच भारतातील स्त्रीवादी जाणीवेची परंपरा व इतिहास लक्षात घेऊन स्त्रीवादी साहित्य संकल्पनेची पुनर्मांडणी करणे गरजेचे ठरते.

**स्त्रीवाद व्याख्या व स्वरुप पुढीलप्रमाणे –**

1. **स्त्रीवाद व्याख्या**

1- Webster's Dictionary –
"The Principle that women should have political rights equal to those of men." [१]

2- Charlotte Bunch (1981) :
"Feminism is not about "adding in" women's right's but about transforming society. So that feminism may be called "transformational politics".
अनुवाद – ''स्त्रीवाद म्हणजे स्त्री हक्कांमध्ये ''भर घालणे'' नसून समाजाचे परिवर्तन करणे होय. म्हणून स्त्रीवादाला ''परिवर्तनात्मक राजकारण'' म्हणणे योग्य ठरेल.'' [२]

3- सीमॉन द बोव्हा :
''स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख करुन देणे. स्त्री प्रश्नांप्रती आस्था निर्माण करणे.'' [३]
यावरुन स्त्रीवादी साहित्याचा पुढीलप्रमाणे विचार करता येईल.

1. 'ज्यात स्त्रियांचे स्त्रियांनी केलेले चित्रण आहे ते साहित्य.'
2. 'स्त्रियांचे स्वतःसंबंधीचे साहित्य.'
3. 'ज्यातून 'स्व' चा शोध घेतला आहे आणि जे 'स्व' त्वाच्या जाणिवेने लिहिलेले आहे. असे साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य.'

यावरुन असे लक्षात येते की, स्त्रीत्वाचा स्वतंत्रपणे घेतलेला शोध म्हणजे स्त्रीवाद होय. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता व निधर्मवाद, तसेच मानवी दुःखाला करुणेचे अधिष्ठान देणे या नैसर्गिक जाणिवा आविष्कृत करणे आणि उन्नत जीवन जगणे व इतरांना जगविणे, मानवी मूल्यांवर अढळ निष्ठा ठेवून या मूल्यांनी नव्या जगाची पुर्नरचना करणे म्हणजेच स्त्रीवाद होय असे आपणांस स्थूलमानाने म्हणता येईल. स्त्रीवादाच्या व्याख्येनंतर पाश्चात्य स्त्रीवाद म्हणजे काय ते पाहू.

2. **पाश्चात्य स्त्रीवाद**

पाश्चात्य देशात सुमारे २०० वर्षापूर्वी निर्माण झालेल्या यंत्रयुगाने जीवनाला गती आली. १९७५ मध्ये जेव्हा युनोच्यावतीने जगभर आंतरराष्ट्रीय 'स्त्री मुक्ती वर्ष' साजरे झाले. तेव्हा अनेक विचारवंतानी स्त्रियांच्या प्रश्नांकडे अधिक व्यापक व डोळसपणे पाहण्याकडे आपली दृष्टी वळविली.

पाश्चात्य देशांतील स्त्रीचा स्वातंत्र्यविषयक जाणिवेचा पहिला टप्पा म्हणजे, मतदानाचा हक्क मिळविणे हा होता. याबरोबरच शिक्षण, संपत्ती, समान कायदा, मताधिकाराची चळवळ यासाठी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इत्यादी देशांमध्ये अनेक चळवळी उदयास आल्या. त्यानंतर साहित्य, प्रकाशन संस्था, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि चर्चासत्रे यांच्याद्वारे स्त्रीवादी चळवळीने वैचारिक क्षेत्रात नवे मंथन सुरु केले. स्त्रीवादी विचारांची बैठक व पुरुषांच्या दास्यत्वातून स्त्रीची

मुक्तता हे ध्येय या नव्या चळवळींमागे होते.

'मेरी वुलस्टोन क्रॉफ्ट' हिचे 'A Vindication of Rights of Women' (1792), 'जॉन स्टुअर्ड मिल' चे 'The Subjection of Women' (1869), 'व्हर्जिनिया वुल्फ' चे 'A Room of One's Own' (1929), 'सिमॉन–द–बोव्हाचे 'The Second Sex' (1949), बेटी फ्रिडनचे 'Feminine Mystique', शुलामिथ फायरस्टोनचे 'The Dielactic of Sex', केट मिलेटचे 'Sexual Politics' इत्यादी ग्रंथांच्या अभ्यासाने पाश्चात्य स्त्रीवाद ही संकल्पना अधिक समजून येईल.

पाश्चात्य देशात झालेल्या मताधिकार व स्त्रीअस्तित्व शोधासाठी विविध चळवळी व साहित्य यांच्याआधारे असे दिसून येते की स्त्रीवादी चळवळीतून निर्माण झालेल्या विविध देशीय (अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स), राजकीय व वैचारिक दृष्टिकोनाच्या माध्यमातून स्त्रीच्या मानवीपणाची ओळख पटवून देणे आणि त्याबरोबरच पुरुषप्रधान समाज – संस्कृती – संरचनेचे राजकारण उघड करुन त्यामध्ये परिवर्तन घडवून स्त्रीचे दुय्यमत्व नष्ट करुन तिला 'माणूस' म्हणून अस्तित्व प्राप्त करुन देणे. हा पाश्चात्य स्त्रीवादाचा मुख्य हेतू आहे.

पाश्चात्य स्त्रीवादाच्या स्वरुपानंतर भारतीय स्त्रीवादाच्या संकल्पना व स्वरुप पाहू.

### 3. भारतीय स्त्रीवाद : संकल्पना व स्वरुप

#### अ) भारतीय स्त्रीवाद संकल्पना –

1. डॉ. अश्विनी धोंगडे –

"संस्कृतीच्या हजारो वर्षाच्या इतिहासाने बाईचे माणूसपण नाकारुन तिला जी पशुतूल्य अवस्था प्राप्त करुन दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण झालेले हे व्यासपीठ आहे."[4]

2- डॉ. मंगला वरखेडे –

"धर्मसंस्था, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकीय संस्था, शिक्षणसंस्था यांच्या संस्थात्मक बांधणीतला पुरुषसत्ताक मतलबीपणा उघड करणे, रुढी–परंपरा, कायदा, तत्त्वज्ञान, सौंदर्यविचार, भाषा यातील पुरुषसत्ताक मूल्यांना प्रश्नांकित करणे आणि जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील आचार–विचारांत दिसणारी स्त्री–पुरुष विषमतेतील विसंगती उघड करीत नवसमाज निर्मितीच्या विविध पर्यायांचा शोध घेणे हे स्त्रीवादी तत्त्वज्ञानाचे स्वरुप आहे."[5]

3- उषा शिंदे –

"'स्त्रीवाद' ही संकल्पना लढयातून उत्क्रांत झाली. कला, कायदा, रुढी, संस्था व लोकमत या सर्व स्तरावर स्त्रियांनी माणूसपणाचा मूल्ययुक्त हक्क प्राप्त होण्यासाठी जाणीवपूर्वक दिली जाणारी राजकीय लढाई म्हणजे स्त्रीवाद होय."[6]

4- डॉ. उषा देशमुख –

"स्त्रीवाद म्हणजे इतरांवर अधिकार गाजविणे नव्हे तर स्त्रीप्रश्नांसंबंधी समाजात एक व्यापक दृष्टिकोन निर्माण करणे हा आहे."[7]

यावरुन असे लक्षात येते की, "भारतीय स्त्रीवाद म्हणजे शतकानुशतके माणूसपण नाकारलेल्या स्त्रीला पशुतूल्य अवस्थेतून मुक्त करण्यासाठी अनिष्ठ प्रथा, परंपरा, रुढी, संस्कृती, पुरुषसत्ताक व्यवस्था व स्त्री–पुरुष विषमता यांना अव्हेरुन स्त्रीविषयक अस्तित्वाबाबत एक व्यापक दृष्टिकोन निर्माण करुन समता व मानवतावादी नवसमाजाच्या निर्मितीसाठी केलेली जाणीवपूर्वक कृती होय."

#### ब) भारतीय स्त्रीवादाचे स्वरुप –

भारतीय स्त्रीवादाच्या केंद्रस्थानी असलेली भारतीय स्त्री ही भारतीय संस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण घटक असून भारतीय संस्कृतीच्या जतन, संवर्धनात स्त्रीचा मोलाचा वाटा आहे. भारतीय संस्कृती ही भारतीय स्त्रीवर अवलंबून आहे असेही म्हणता येईल. भारतीय स्त्री ही अनिष्ट रुढी–परंपरा, संस्कृती, ग्रंथ–पुराणे, मूल्यव्यवस्था, पुरुषसत्ताक व्यवस्था, गुलामगिरी, दास्यत्व इत्यादींच्या बंधनात शतकानुशतके जखडली गेली आहे. येथील नैतिक–अनैतिकतेच्या संकल्पना पाश्चात्यांच्या तुलनेत भिन्न आहेत. 'लग्नसंस्थेस नकार, लग्नाशिवाय एकत्र राहणे, मुक्त लैंगिक संबधं ठेवणे, स्त्री ही केवळ उपभोगाचे साधन इत्यादी पाश्चात्य संस्कृतीत मान्य असलेल्या संकल्पनांना भारतीय संस्कृती व पर्यायाने स्त्रीही नकार देते. शतकानुशतके अन्याय–अत्याचार, अनिष्ट रुढी–परंपरांना, अज्ञान, अंधश्रध्दा, हुंडा पद्धती, स्त्री विक्रय, बुरखा पद्धती, देवदासी, आर्थिक मोबदल्यातील फरक, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, वर्णव्यवस्था, एक स्त्री म्हणून असलेले पुरुषप्रधान व्यवस्थेतील दुय्यम स्थान त्यातच पुन्हा जातीतील म्हणून असे विविध कारणांनी स्त्रीचे शोषण केले जात होते व आहे. भारतीय स्त्रीवाद हा विकसनशील राष्ट्र, कृषीप्रधान अर्थव्यवस्था, सर्वसामान्य कुटुंब व त्यातील स्त्री यांच्याशी निगडीत आहे. त्यामुळे अशा स्त्रियांना दररोजच कोणत्या ना कोणत्या समस्येला सामोरे जावे लागते. संघर्ष करावा लागतो. उपजिविका, निवास, प्रवास, दारिद्र्य, महागाई, बेकारी, रोजगार, असुरक्षितता, पुरुषसत्ताक व्यवस्था इत्यादी समस्यांबरोबर या स्त्रीव्यवस्थेची नाळ जोडलेली आहे. या शतकानुशतकांच्या संघर्षापासून, बंधनातून स्त्रीला मुक्त करण्याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महावीर, बळी, बुद्ध, चार्वाक, संत बसवेश्वर, चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम, छ. शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षि शाहू, डॉ. आंबेडकर, आगरकर, कर्वे इत्यादी उदारमतवादी, पुरोगामी, सुधारणावादी विचारवंताकडून झाले. त्यामूळे त्यातूनच प्रेरणा घेऊन आत्मभान जागृत झाल्यामुळे काही स्त्रिया स्वातंत्र्य व स्त्रीमुक्तीसाठी झटू लागल्या. काही स्त्रियां स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाल्या. तर सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई सारख्या स्त्रिया स्त्रीमुक्तीसाठी पुढे सरसावल्या प्रसंगी त्यांना हालअपेष्टाही सहन कराव्या लागल्या. पण त्यांनी कुठल्याही प्रकारे माघार घेतली नाही. कारण त्यांचा हेतू केवळ 'स्व' केंद्रीत नव्हता तर एकूणच भारतीय स्त्रीला केंद्रीत ठेवणारा होता. भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे शोषण करणारा, 'मारणारा' पुरुषार्थ होता तसाच तिला या जोखडातून मुक्त

करणारा व 'तारणारा' ही पुरुषच होता. याची जाण मात्र या स्त्रियांनी ठेवली. त्यामुळे ताराबाई शिंदे यांच्यासारखे लेखन अपवाद वगळता भारतीय स्त्रीवादाला परंपरा शरणतेमूळे पुरुषद्वेषाची धार नाही असे म्हणता येईल. तसेच भारतीय स्त्री मनावर, समाजमनावर रुजलेली 'घर' ही संकल्पना केंद्रस्थानी असल्यामुळे या समाजसुधारणेच्या कार्यात स्त्री मुक्तीचा विचार करताना तिची पारंपरिक समाजव्यवस्थेला नकार देण्याची भूमिका दिसून येत नाही. तिचा संघर्ष, तिचा लढा हा केवळ 'पुरुष' या व्यक्तीविरुध्द नसून स्त्रीचे शोषण करणाऱ्या पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुध्द आहे. आणि त्यामुळेच या मानवतावादी मनोवृत्ती, दृष्टिकोनातून ती स्त्रीला मुक्त करत असताना आपल्याच मातीशी एकनिष्ठ राहून, आपल्याच मातीत पाय रोवून प्रस्थापित शोषणव्यवस्थेपासून मुक्त होऊन – इतरांनाही याची जाणीव करुन देऊन सामंजस्य, समता, मानवता यावर आधारीत व्यापक जगाची पुनर्रचना करणे हे भारतीय स्त्रीवादाचे प्रमुख ध्येय आहे.

**क) भारतीय स्त्रीवादाचे वेगळेपण –**

भारतीय स्त्रीवादाचे वेगळेपण हे पाश्चात्य व भारतीय स्त्रीवादाचा तुलनात्मक रीतीने विचार केल्यास समजून येईल. पाश्चात्य स्त्रीवादाच्या केंद्रस्थानी असलेली स्त्री ही एका विकसित राष्ट्र व सुखवस्तू घराशी निगडीत असून पाश्चात्यांची संस्कृती, आचार–विचार, मूल्यव्यवस्था ही भारतीय संस्कृती व त्यातील मूल्यव्यवस्था, परंपरा, रुढी, चालीरिती, नैतिकमूल्ये, जातीव्यवस्था, धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था याहून भिन्न आहे. भारतीय संस्कृती ही त्यागावर तर पाश्चात्य संस्कृती ही भोगावर आधारीत आहे. भारतीय स्त्रीवाद हा विकसनशील राष्ट्र, कृषीप्रधान व्यवस्थेशी, सर्वसामान्य कुटुंब व त्यातील स्त्री यांच्याशी निगडीत आहे त्यामुळे भारतीय स्त्रीला पाश्चात्य स्त्रीच्या तुलनेत अधिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे भारतीय स्त्रीवाद हा पाश्चात्य स्त्रीवादापेक्षा वेगळा व वरचा ठरतो. याबाबत **डॉ. रचना माने यांनी** भारतीय स्त्रीवादाबाबत मांडलेले विचार पुढीलप्रमाणे आहेत.

"भारतीय मनोवृत्तीतील मानवतावादी मूल्यांचा अव्हेर करुन पराकोटीच्या व्यक्तीवादी जाणिवेतून आकारास आलेला पाश्चात्य स्त्रीवाद आपण स्वीकारला तर भारतीय मानवी मूल्यांशी नाळच तोडल्याने आपण अंगीकारलेला स्त्रीवाद खरा भारतीय स्त्रीवाद होऊच शकणार नाही. उलट माणसा माणसातील अंतर निर्माण करणाऱ्या गोष्टींचा बिमोड करुन समानतेच्या नव्या वाटांनी मार्गक्रमण करणारा स्त्रीवादच खऱ्या अर्थाने भारतीय स्त्रीवाद ठरेल व जागतिक स्त्रीवादाच्या पार्श्वभूमीवर स्वतःच्या वेगळ्या वैशिष्ट्यानिशी ठसा उमटवेल. समाजविघातक प्रवृत्तींचा बिमोड करणारी एक समर्थ परंपरा भारतात प्राचीन कालखंडापासून वाटचाल करत असल्याचे दिसून येते. भारतीय स्त्रीवादाला या पावलांमध्ये स्वतःची पावले मिसळून अत्यंत आत्मविश्वासपूर्वक वाटचाल करणे गरजेचे आहे."

यावरुन असे म्हणता येईल की भारतीय स्त्रीवाद हा स्वतंत्र, स्वत्त्ववादी व मानवतावादी तसेच व्यापक व श्रेष्ठ असा स्त्रीवाद असुन भारतीय स्त्रीवादाशी निगडीत असलेल्या मानवतावादी मूल्यांना नाकारुन जर पाश्चात्य स्त्रीवादाचा स्वीकार केला तर खऱ्या अर्थाने आपण भारतीय स्त्रीवादास पोरके होऊ.

**भारतीय स्त्रीवादी साहित्याचा आढावा –**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात झालेल्या स्त्री सुधारणाविषयक चळवळी व स्वातंत्र्योत्तर काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या महिला परिषदा, मेळावे, अधिवेशने, विविध नियतकालिके, स्त्री–मुक्ती चळवळी, आंबेडकरांनी स्त्रियांना दिलेले घटनात्मक हक्क व अधिकार, त्यातून जागृत झालेले, गतीमान झालेले मानवी जीवन व विद्रोही भूमिका घेऊन पुढे येणाऱ्या स्त्रियांची मनोवृत्ती स्त्री–जीवनाचा विकास, सामाजिक परिवर्तने व स्त्रीजीवनजाणिवा, भावविश्व, तिचे अस्तित्व, व्यथा, वेदना, संवेदनांसह शब्दबद्ध होऊ लागले. तिच्या अस्तित्वाच्या, समस्यांच्या अनुषंगाने निर्माण होणारे विविध प्रश्न : अविवाहित, घटस्फोटीत , पुर्नविवाहीत, परित्यक्ता, स्वतंत्र व मुक्त एकाकी स्त्री जीवन, विवाहबाह्य संबंध, विविध नातेसंबंध, तिची भावनिक आंदोलने, नोकरदार स्त्रियांच्या समस्या, नोकरीतील प्रश्न, स्त्रियांवरील विविध सामाजिक बंधने, परंपरा, रुढी, संस्कृती व त्यात जखडलेले स्त्रीजीवन, हुंडा पद्धती, स्त्रियांच्या आत्महत्या, बलात्कार, विनयभंग, एकतर्फी प्रेम, प्रेमभंगातून निर्माण झालेली मानसिक स्थिती, शिक्षित स्त्रियांचा भावनिक कोंडमारा तसेच कामगार चळवळ, भटक्या–विमुक्त, झोपडपट्टीतील, फ्लॅटसंस्कृतीमधील, ग्रामजीवनातील आणि उच्चभ्रू संस्कृतीमधील स्त्रीजीवनाची स्पंदने, नव्या जीवनजाणिवेतून व स्त्री मुक्तीच्या भाषेतून मुखर करुन स्त्रीवादी साहित्याला बहुआयामित्व दिले. यामध्ये पुढील काही वाङ्मय प्रकारांचा थोडक्यात उल्लेख करता येईल.

**कथा –**

छाया दातार – वर्तुळाचा अंत, सरिता पदकी – घुस्मट, मेघना पेठे – आंधळयाच्या गायी, विभावरी शिरुरकर – कळ्यांचे निश्वास, प्रिया तेंडुलकर – ज्याचा त्याचा प्रश्न, जावे तिच्या वंशा तसेच कमल देसाई, वसुंधरा पटवर्धन, सानिया, आशा बगे, ज्योत्स्ना देवधर, विजया राजाध्यक्ष, अनुराधा वैद्य, अंबिका सरकार इ. स्त्री लेखिकांनी कथाविश्व अधिक समृध्द केले आहे.

**कविता –**

ज्योती लांजेवार – दिशा, शब्दनिळे, आभाळ, झेप, मल्लिका अमरशेख – वाळूचा प्रियकर, देहऋतू, प्रज्ञा लोखंडे – अंतःस्थ, उत्कट जीवघेण्या धगीवर, संध्या रंगारी – आघात, कवडसे, उषाकिरण आत्राम – म्होरकी, सुरेखा भगत – साक्ष, अश्विनी धोंगडे – स्त्रीसूक्त, मेघना पेठे – हंस अकेला, तसेच मिना गजभिये, हिरा बनसोडे, प्रतिमा इंगोले, प्रज्ञा पवार, सुमती लांडे, अनुराधा पाटील, जया गायकवाड इत्यादींचे काव्य.

**आत्मचरित्र व आत्मकथन –**

शांताबाई कांबळे – माझ्या जीवनाची चित्तरकथा, बेबी

कांबळे – जीणं आमुचं, मल्लिका अमरशेख – मला उध्वस्त व्हायचंय, नज़ुबाई गावित – आदोर, उर्मिला पवार – आयदान, हंसा वाडकर – सांगते ऐका, कुमुद पावडे – अंतःस्फोट, इंदुमती जोंधळे – बिनपटाची चौकट, स्नेहप्रभा प्रधान – स्नेहांकिता, प्रिया तेंडुलकर – पंचतारांकित, विद्यादेवी परचुरे – वंचिता, निर्मला देशपांडे – भाळी गोंदण चांदणं. इ. आत्मकथांमधून भारतीय स्त्रीवादाचे प्रतिबिंब उमटले आहे.

**नाटक –**

प्रेमानंद गज्वी 'देवनगरी' मधून देवदासी प्रथेने दलित स्त्रियांचे केलेले शोषण. तसेच रामनाथ चव्हाण यांनी 'बायको मी देवाची' या नाटकाद्वारे मुरळीची व्यथा व मुरळी प्रथेमधील अमानवी नातेसंबंध चित्रित केला आहे.

या सर्वच कलाकृतींच्या माध्यमातून स्त्रीविश्वाची बदलती रुपे, स्त्रियांच्या संवेदना व जीवनजाणिवांसहीत स्त्री जीवनाचा व्यापक पटच नजरेसमोर आणला आहे. तसेच दलित आत्मकथने व दलित कविता यांच्यामधून स्वतःला सावरीत युगानुयुगे पुरुषसत्तेत भरडलेल्या, पिडीत, शोषित, शापित राहिलेल्या, दुहेरी दलितत्त्वात पिचलेल्या स्त्रीच्या आंतरिक दुखःभोगाचा डोळस अविष्कार म्हणजे स्त्रियांना डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या स्त्रीमुक्ती, समता, न्याय, हक्क व अधिकार यामुळे आलेल्या आत्मभानाचा परिपाक होय. एकंदरीतच या सर्व साहित्यामुळे मराठी स्त्रीवादी साहित्याला अधिक विस्तृत केले आहे. त्यामुळे स्त्रियांच्या जाणिवेच्या कक्षा रुंदावण्यास मदत होत आहे.

**निष्कर्ष –**

1. भारतीय स्त्रीवादी साहित्यावर अंधश्रध्दा, रुढी, परंपरांचा व संस्कृतीचा प्रभाव आहे.
2. भारतीय स्त्रीवादी साहित्यास एक इतिहास आहे, परंपरा आहे. उदा. चार्वाक, गौतम बुद्ध, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय इ.
3. भारतीय स्त्रीवाद हा एक वेगळी संस्कृती असलेला व स्वतंत्र स्त्रीवाद असुन पाश्चात्य स्त्रीवादापेक्षा भारतीय स्त्रीवाद हा वेगळा व सक्षम ठरतो.
4. मध्ययुगीन व संत साहित्यात स्त्रीवादी जाणिवेचे अंश सापडतात पण फुलेंच्या प्रेरणेने लिहिलेल्या साहित्यात स्त्रीवादाची जाणीव अधिक गतीमान झाल्याचे दिसते.
5. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत निर्माण झालेल्या साहित्याने स्त्रीवादी जाणीवेला, जगण्याला नवे परिमाण प्राप्त करुन दिले.
6. भारतीय स्त्रीवादी साहित्य संकल्पना अधिक व्यापक व मानवतावादी आहे.
7. भारतीय स्त्रीवादाचा अभ्यास केल्याशिवाय इतर कोणत्याही स्त्रीवादाचा अभ्यास करणे अपूर्ण ठरेल.

**संदर्भसूची –**


1. माने रचना : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरुप' कोल्हापूर, अक्षर दालन. प्रथमावृत्ती २०१३, पृ. क्र. १९ वरुन उदधृत.
2. तत्रैव पृ. क्र. २८
3. तत्रैव पृ. क्र. २०
4. धोंगडे अश्विनी : 'स्त्रीवादी समीक्षा – स्वरुप आणि उपयोजन' पुणे, दिलिपराज प्रकाशन. प्रथमावृत्ती १९९३, पृ.क्र. ६.
5. वरखेडे मंगला : 'स्त्रीवाद : समीक्षेतील नव्या संकल्पना' जाधव मनोहर (संपा.) औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन, प्रथमावृत्ती २००१, पृ.क्र. १२४.
6. माने रचना : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरुप' उ.नि., पृ.क्र. २८.
7. पाटील शोभा : 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध' पुणे, मल्हार प्रकाशन, प्रथमावृत्ती २००२, प्रस्तावना, पृ. क्र. दोन.
8. माने रचना : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरुप' उ.नि.पृ.क्र. १३५, १३६
9. पाटील शोभा : 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध' उ.नि.पृ.क्र. ३१७ - ३९८
10. प्रा. सोनाळकर : '१९६० नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनातील सामाजिकता' अप्रकाशित प्रबंध, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.
11. कऱ्हाडे सदा : 'दलित साहित्य चिकित्सा' औरंगाबाद, स्वरुप प्रकाशन,